पनवेल महानगरपालिका यांचा विशेष महासभा ठराव क्र.१, दिनांक २६.०३.२०१८ निलंबित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : - पमपा-२२१८/प्र.क्र.१३८/नवि-२३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक :- १२ एप्रिल, २०१८

संदर्भ :- (१) महापौर, पनवेल महानगरपालिका यांचे जा.क्र.पमपा/महापौर कार्यालय/७०६/RR/८७/२०१५, दिनांक २६.०३.२०१८ चे पत्र.
(२) आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचे जा.क्र.पमपा/मुख्यालय/४०२१/२०१८, दिनांक ०६.०४.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना : -

पनवेल महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०१.१०.२०१६ रोजी झाली असून डॉ.सुधाकर शिंदे यांची नियुक्ती प्रथम प्रशासक म्हणून व नंतर आयुक्त म्हणून पनवेल महानगरपालिकेत करण्यात आली.

महापौर, पनवेल महानगरपालिका यांनी संदर्भाधीन पत्र क्र. १ अन्वये डॉ.सुधाकर शिंदे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचेविरुध्द दिनांक २६.०३.२०१८ च्या विशेष महासभेत महापालिका अधिनियम कलम ३६(३) अन्वये अविश्वास (शिस्तभंग कारवाई) चा ठराव ५० विरूध्द २२ मताने पारित केला असल्याचे कळवून उक्त ठराव आवश्यक कार्यवाहीकरीता शासनाकडे सादर केला आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या विशेष महासभेच्या दिनांक २६.०३.२०१८ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३६ (३) अन्वये अविश्वास ठराव क्र.१, दिनांक २६.०३.२०१८ उक्त ठरावाबाबत डॉ.सुधाकर शिंदे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा खुलासा दिनांक ०४.०४.२०१८ रोजी मागविण्यात आला. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांनी त्यांचा खुलासा दिनांक ०७.०४.२०१८ च्या पत्रान्वये शासनास सादर केला.

पनवेल महानगरपालिकेच्या विशेष महासभेतील ठराव क्र. १, दिनांक २६.०३.२०१८ रोजी पारित करण्यात आलेल्या ठरावात आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचेविरुध्दच्या ठरावात विकास कामांबाबत अनास्था, प्रशासनावर नसलेला अंकुश, कर्तव्यात व जबाबदारीत कसुर करणे, भ्रष्टाचार करणे, हुकुमशाही पध्दतीने वागणे, लोकप्रतिनिधींबद्दल जनतेमध्ये हेतू पुरस्पर रोष निर्माण करणे तसेच आर्थिक परिस्थिती डबघाईस आणणे, इ. मुद्यांचा अंतर्भाव आहे.

आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अहवालात त्यांच्या कार्यकालात शासनाच्या विविध योजनांची झालेली अंमलबजावणी उदा. स्वच्छ भारत अभियान, अमृत योजना, पंतप्रधान आवास योजना, डे-एन.यु.एल.एम., इ. तसेच इतर उल्लेखनिय कामे उदा. Online Building Permission, प्लास्टिक बंदी, शिक्षण विभागातील शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांची बायोमेट्रीक उपस्थिती, अतिक्रमणांविरोधात कारवाई, इ. बाबी सविस्तरपणे नमुद केल्या आहेत. तसेच त्यांनी पायाभुत सेवा, सुविधा तसेच नागरी सुविधांकरीता हाती घेतलेल्या कामांबाबत माहिती उपलब्ध केली आहे. तसेच स्थानिक संस्था कर, मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकी वसुली, न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेली वसुली थकबाकी, इ. वर लक्ष केंद्रीत करून महानगरपालिकेची वसुली वाढविल्याचेही कळविले आहे.

आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांनी भ्रष्टाचार, प्रशासकीय शैथल्य, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान, इ. संदर्भात कर्तव्य कसुर केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येत नाही.

महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे प्रशासन, विविध कल्याणकारी योजना कार्यक्रम, मुलभुत सेवा व पायाभुत सुविधा पुरविणे, इ. अत्यंत महत्त्वाची कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व इतर शासन आदेश व धोरणांनुसार सोपविली आहेत.

महासभेच्या विशेष सर्वसाधारण सभेने पनवेल महानगरपालिकेच्या विशेष महासभेने आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचेविरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३६(३) अन्वये पारित केलेला अविश्वास ठराव क्र.१, दिनांक २६.०३.२०१८ ची अंमलबजावणी केल्यास महापालिकेचे दैनंदिन काम, कल्याणकारी योजना व कार्यक्रम यांची अंमलबजावणी तसेच नागरीकांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभुत सुविधा व नागरी सेवा यामध्ये अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. यास्तव, उक्त ठराव पनवेल महानगरपालिकेच्या नागरिकांच्या व्यापक लोकहिताविरुध्द आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ४५१(१) नुसार महापालिकेचा कोणताही ठराव व्यापक लोकहिताविरुध्द आहे, असे राज्य शासनाचे मत झाल्यास उक्त ठरावाचे कार्यान्वयन निलंबित करण्याचे अधिकार राज्य शासनास प्राप्त आहेत. यास्तव, शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त बाबींचा विचार करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ४५१ (१) नुसार प्राप्त अधिकारात पनवेल महानगरपालिकेच्या विशेष महासभेचा ठराव क्र.१, दिनांक २६.०३.२०१८ याद्वारे निलंबित करण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ४५१ (२) नुसार सदर प्रकरणी सबंधितांना शासनास काही अभिवेदन करावयाचे असल्यास निलंबन आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०४१२१६५८३४२९२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
Date: 2018.04.12 17:00:49 +05'30'

(शंकर जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४) राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) महापौर, पनवेल महानगरपालिका, पनवेल, जि.रायगड.
६) आयुक्त, पनवेल महानगपालिका, जि.रायगड.
७) महापालिका सचिव, पनवेल महानगरपालिका, जि.रायगड.
८) निवड नस्ती, नवि-२३